MHKO160004972021

<u>रे.क.नं. ६७/२०२१ मधील नि. ५ खालील आदेश</u>

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चा नियम ३९, आदेश १,२ अन्वये प्रतिवादी नं. १ ते ३, ६, ७ विरूध्द तूर्तातूर्त मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जाची थोडक्यात हकिकत अशी की,

मौजे थेरगाव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर येथील ग्रा.पं. यांचेकडील सन २०१९-२० ते २०२२-२३ या सालाकरीता कर आकारणी यादीस नोंद असलेली घर मिळकत नं. ४७ आणि त्याचे दक्षिण बाजुकडील २५ x १५ = ४०० चौ.फू. पडसर ही मिळकत या अर्जाचा मुख्य वादविषय आहे. सदर मिळकतीस सोईकरीता येथून पुढे दावा मिळकत असे संबोधण्यात येत आहे. वादी यांनी दावा मिळकतीचे सविस्तर वर्णन अर्जामध्ये केले आहे. दावा मिळकत ही वादी यांचे मालकी आणि कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. वादी यांची दावा घर मिळकत आणि पडसर जागा यामध्ये शांततामय कब्जेवहिवाट आहे. वादी हे दावा पडसर जागेमध्ये जनावरे, गुरे बांधण्याकरीता, शेती अवजारे ठेवण्याकरीता छप्पर घातलेले होते, सध्या वादी हे छप्पर काढून १५ x १० चे शेडचे बांधकाम करणार आहेत. प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांचा दावा मिळकतीशी कोणताही हक्क-हित, संबंध नाही. प्रतिवादी नं २ ते ७ यांचे सांगणेवरून प्रतिवादी नं १ हे वादी यांना नेहमी त्रास देत आहेत आणि बांधकामास अडचणी निर्माण करीत आहेत. वादी यांनी प्रतिवादी नं १ यांचे विरूध्द या न्यायालयामध्ये हक्कज्ञापन आणि मनाईकरीता रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ हा दाखल केलेला होता, सदरचा दावा निकाली झालेला आहे. प्रतिवादी नं २ ते ७ यांनी वादी यांचे विरूध्द रेग्युलर कज्जा नं ४८/२००६ हा रस्त्यास अडथळा करू नये म्हणून कायम मनाईकरीता दाखल केला होता, सदर दाव्यामध्ये दावा पडसर जागेमध्ये कोणताही रोड नसल्याबाबत निष्कर्ष काढला असून, सदरचा दावा दि.३०/०६/२०१५ रोजी नामंजूर झालेला आहे. दावा मिळकत पडसर जागेमध्ये ग्रा.पं. रोड अस्तित्वात नाही, असे असताना प्रतिवादी नं २ ते ७ यांचे सांगण्यावरून प्रतिवादी नं १ हे दावा मिळकत दांडगाव्याने

बळकावून त्यामधून रस्ता करू पाहात आहेत. प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ हे वादी यांचे दावा पडसर जागेमधील बांधकामाचे नुकसान करीत आहेत आणि त्यामधून रस्ता करणारच अशी धमकी देत आहेत. प्रतिवादी नं २ ते ७ यांनी दावा मिळकत पडसर जागेबाबत पो. ठाणे बांबवडे येथे खोटी तक्रार दाखल केली होती. दि.१७/०७/२०२१ रोजी प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांनी वादी यांना दावा मिळकतीमधील घराचे बांधकाम जेसीबी मशीनच्या साहाय्याने पाडून टाकू अशी धमकी दिली आहे. प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांचे वर नमूद वर्तनामधून दावा मिळकतीचे संरक्षण करण्यासाठी वादी यांनी हा दावा दाखल केला आहे. वादी यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी नं. १ ते ३, ६, ७ यांनी दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये, दावा पडसर जागेतील नवीन शेडचे बांधकामास हरकत-अडथळा अगर रस्ता करू नये अशी तूर्तातूर्त मनाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे. वादी यांनी नि.२० येथे पुरशिस दाखल करून त्यांना प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं ४ आणि ५ विरूध्द चालविणेचा नाही असे कथन केले आहे.

३. प्रतिवादी नं. १ ते ३, ६, ७ यांना दावा समन्स आणि नोटीसची बजावणी झाली आहे. प्रतिवादी नं. १ यांनी निशानी १३ येथे, प्रतिवादी नं. २,३,६ व ७ यांनी निशानी ३२ येथे आपली कैफियत आणि म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी नं. १ यांनी निशानी १३ वरील आणि प्रतिवादी नं. २,३,६ व ७ यांनी नि. ३२ वरील कैफियतीमध्ये दावा आणि प्रस्तुत अर्जामधील संपूर्ण मजकूर खोटा, चूकीचा असून तो त्यांना मान्य, कबूल नाही असा नाकारला आहे. दावा मिळकत ही वादी यांच्या मालकीची आहे हे दाखविणेची संपूर्ण जबाबदारी वादी यांची आहे. वादी यांनी दावा मिळकतीचे मालकीबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाव्याचे कामी हजर केलेला नाही. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतूदींनुसार बांधकाम करावयाचे झाल्यास ग्रा.पं. थेरगाव यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे, जर विनापरवाना बांधकाम सुरू असेल तर सदरचे बांधकाम पाडण्याचा अथवा थांबविण्याचा अधिकार ग्रा.पं. थेरगाव यांना आहे. वादी हे बेकायदेशीररित्या ग्रा.पं. थेरगाव यांच्या मालकीच्या मोकळया जागेमध्ये, सदर जागेचा वापर गावातील लोक ये-जा करण्यासाठी करीत आहेत अशा जागेमध्ये अतिक्रमण करून बांधकाम करण्याच्या प्रयत्नात आहेत. दावा मिळकत पडसर जागा वादी यांच्या मालकीची नाही. दावा मिळकत पडसर जागेची मालकी ठरविण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. दावा मिळकत पडसर जागेमध्ये वादी यांनी कधीही जनावरे बांधणेकरीता, शेती अवजारे ठेवण्याकरीता छप्पर घातलेले नव्हते. वादी यांनी या न्यायालयामध्ये रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ हा दावा मिळकतीबाबत दाखल केलेला होता, सदरचा दावा गुणदोषावर नामंजूर झालेला आहे. वादी यांनी रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ चे निर्णयाविरूध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय,

कोल्हापुर यांचे न्यायालयामध्ये विलंब माफी अर्जासोबत अपील दाखल केले होते, परंतू मा. न्यायालयाने विलंब माफीचा अर्ज नामंजूर केलेला आहे. परिणामी, रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ चा निर्णय अंतिम झालेला आहे आणि तो कोणत्याही वरिष्ठ न्यायालयाने रद्दबातल केलेला नाही. रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ मधील निर्णय वादी यांचेवर बंधनकारक आहे. रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ मधील निर्णय हा अंतिम झाला असल्यामुळे प्रस्तुत दाव्यास रेसजुडिकाटा तत्वाची बाधा येत आहे. वादी या महिला असल्याचा गैरफायदा घेवून गावातील लोकांना त्रास देत आहेत, वारंवार ग्रा.पं. वरती दावे दाखल करीत आहेत आणि बेकायदेशीररित्या सरकारी जागेमध्ये अतिक्रमण करून बांधकाम सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी यांनी त्यांचे तथाकथित बांधकामाकरीता ग्रा.पं. थेरगाव यांची परवानगी घेतलेली नाही. ग्रा.पं. थेरगाव यांनी वादी यांना त्यांचे मालकीचे जागेतील अतिक्रमण काढण्यासाठी रितसर नोटीस दिलेली आहे. प्रतिवादी नं. १ ते ३, ६, ७ यांनी वर नमूद कारणांवरून अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. मी वादी, प्रतिवादी नं. १ ते ३, ६, ७ यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील वादकथन, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे.

५. वादी, प्रतिवादी नं. १ ते ३, ६, ७ यांचे परस्परविरोधी वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे, युक्तीवाद या सर्व घटनांवरून प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी सदर मुद्दयांचा निश्कर्ष कारणमिमांसेसह नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजूने आहे का ? | नाही. |
| २. | सोईस्कर्तेचा तूला वादी यांचे बाजूने आहे का? | नाही. |
| ३. | तूर्तातूर्त मनाई न दिल्यास वादी यांचे नुकसान होणार आहे का ? | नाही. |
| ४. | आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे |

<u>कारणमिमांसा -</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करीता -</u>**

६. वादी आणि प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांचे वादपत्राचे अवलोकन केले असता त्यांना दावा मिळकतीसंदर्भात रेग्युलर कज्जा नं ४३/२००३, रेग्युलर कज्जा नं

४८/२००६ हे निकाली झालेले आहे या घटना प्रथमदर्शनी मान्य असल्याचे स्पष्ट होत आहे.

७. वादी यांनी त्यांचे वादपत्रामध्ये दावा मिळकत घराचे पुढील दावा मिळकत पडसर जागेमध्ये त्यांचे छप्पर होते, सदरचे छप्पर काढून ते जनावरांचे शेडचे बांधकाम करीत आहेत, प्रतिवादी १ ते ७ हे वादी यांचे दावा मिळकतीवरील वर नमूद कब्जेवहिवाटीस हरकत-अडथळे करीत आहेत असे कथन केले आहे. प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांनी वादपत्रामध्ये वादी कथन करतात त्यानुसार दावा मिळकत खुली जागा वादी यांचे मालकीची आहे ही घटना नाकारत आहेत आणि दावा मिळकत अस्तित्वात नाही असे कथन करीत आहेत. सबब, वर नमूद मान्य घटना, वादी, प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांचे वादकथन या सर्व घटनांवरून वादी कथन करतात त्यानुसार दावा मिळकत अस्तित्वात आहे का आणि त्यामध्ये वादी यांचा कब्जा आहे का या घटना प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी प्रथमदर्शनी महत्वाच्या आहेत.

८. वादी यांनी त्यांचे वादपत्रास अनुसय्न नि.३/१ ते ३/५ येथे ग्रा.पं.थेरगाव येथील दावा मिळकतीचे नमुना ८ याचे उतारे दाखल केलेले आहेत. नि.३/१ ते ३/५ वरील उता-यांचे अवलोकन केले असता वादी यांची घर मिळकत आणि त्यासमोरील पडसर जागा असल्याचे प्रथमदर्शनी समोर येत आहे. प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांचे असे वादपत्र आहे की, वादी यांनी प्रतिवादी नं १ यांच्या मालकीच्या गायरान जमीनीमध्ये अतिक्रमण केलेले आहे, त्यामुळे दावा घर मिळकतीसमोरील पडसर जागेची मालकी आणि कब्जा त्यांचा आहे. वादी यांनी नि.३/६, १७/१ येथे प्रतिवादी नं १ यांनी दावा पडसर जागा बाबत प्रतिवादी नं १ आणि बांबवडे पोलीस दूरक्षेत्र यांनी पाठविलेली नोटीस हजर केलेली आहे. नि.३/६, १७/१ वरील नोटीसींचे अवलोकन केले असता सदरच्या नोटीसा दावा पडसर मिळकती याचे अतिक्रमणाबाबत असल्याचे प्रथमदर्शनी समोर येत आहे.

९. नि.३/७, ३/८ येथे अनुक्रमे रेग्युलर कज्जा नं ४७/२००३, रेग्युलर कज्जा नं ४८/२००६ चे न्यायनिर्णय प्रत वादी यांनी दाखल केलेली आहे. नि.३/७ वरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रस्तुतचा दावा, दावा मिळकत पडसर जागेमध्ये त्यांचे शेड आणि छप्पर आहे, त्यास प्रतिवादी नं १ यांनी हरकत-अडथळा करू नये अशा निरंतर मनाईकरीता दाखल केला होता, सदर न्यायनिर्णयामध्ये आलेल्या पुराव्याअंती या न्यायालयाने असा निष्कर्ष नोंदविला आहे की, दावा मिळकत पडसर जागा त्यामधील शेड आणि छप्पर अस्तित्वात नाही, वादी यांनी प्रतिवादी नं १ यांचे मालकीचे गायरान जमीन गट नं ९४९/अ-१ मध्ये अतिक्रमण केले आहे आणि त्यामुळे प्रस्तुतचा दावा नामंजूर करण्यात

आलेला आहे. वादी यांनी त्यांचे वादपत्रामध्ये रेग्युलर कज्जा नं ४७/२००३ चे न्यायनिर्णयाविरूध्द अपील दाखल केलेले आहे असे कथन केले आहे. याउलट, प्रतिवादी नं १ ते ३, ६, ७ यांनी त्यांचे वादत्रामध्ये वादी यांनी रेग्युलर कज्जा नं ४७/२००३ चे न्यायनिर्णय आणि हुकूमनामा याविरूध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापुर यांचे न्यायालयामध्ये विलंब माफी अर्जासोबत अपील दाखल केले होते, परंतू मा. न्यायालयाने विलंब माफीचा अर्ज नामंजूर केलेला आहे. परिणामी, रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ चा निर्णय अंतिम झालेला आहे आणि तो कोणत्याही वरिष्ठ न्यायालयाने रद्दबातल केलेला नाही. रेग्युलर कज्जा नं ४३/२००३ मधील निर्णय वादी यांचेवर बंधनकारक आहे. प्रतिवादी नं १ यांनी त्यांचे वादपत्रास अनुसरून नि.३९/७ येथे किरकोळ दिवाणी अर्ज नं.१३८/२०१७ चे न्यायनिर्णयाची प्रत दाखल केलेली आहे. नि.३९/७ वरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, वादी यांनी रेग्युलर कज्जा नं ४७/२००३ चे न्यायनिर्णयाविरूध्द दाखल केलेले नियमित दिवाणी अपील नं.२९९/२०१० हे पुन्हा फैलावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापुर यांचेसमोर दाखल केला होता, सदरचा अर्ज मा. न्यायालयाने गुणदोषावरती नामंजूर केलेला आहे. वादी यांनी नि.३९/७ चे निर्णयाविरूध्द वरिष्ठ न्यायालयामध्ये दाद मागितली आहे यासंदर्भात कोणतेही वादकथन केलेले नाही अथवा त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सबब, वर नमूद चर्चेमधून प्रथमदर्शनी हे शाबित होत आहे की, रेग्युलर कज्जा नं ४७/२००३ चा नि.३/७ वरील न्यायनिर्णय हा अंतिम आणि कायम झालेला आहे.

१०. नि.३/८ वरील रेग्युलर कज्जा नं ४८/२००६ चे न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी नं २ आणि ३ यांनी वादी यांचे विरूध्द दावा मिळकत खुली जागा ही रस्ता आहे, त्यास वादी यांनी हरकत-अडथळा करू नये याकरीता दाखल केलेला होता, सदरचा दावा, दावा मिळकत रस्ता आहे हे शाबित न झाल्यामुळे तो गुणदोषावरती नामंजर झालेला आहे. रेग्युलर कज्जा नं ४८/२००६ चा न्यायनिर्णय मा. वरिष्ठ न्यायालयासमोर बदलण्यात आलेला आहे या घटनेचा प्रथमदर्शनी पुरावा दाखल नाही. सबब, नि.३/७ आणि ३/८ वरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, दावा मिळकत पडसर जागा अस्तित्वात नसल्याचे गुणदोषाअंती शाबित झालेले आहे. वर नमूद चर्चेमधून रेग्युलर कज्जा नं ४७/२००३, रेग्युलर कज्जा नं ४८/२००६ चे न्यायनिर्णय अंतिम आणि कायम झाले आहेत हे प्रथमदर्शनी शाबित झालेले आहे. नि.३/७, ३/८ वरील न्यायनिर्णयामध्ये दावा मिळकत पडसर जागा अस्तित्वात नसल्याचे गुणदोषावरती शाबित झालेले आहे. वर नमूद परिस्थिती असताना वादी यांनी प्रस्तुतचा दावा, दावा मिळकत पडसर जागेकरीता, जी प्रत्यक्षात अस्तित्वात नाही असे असतानादेखिल दाखल केलेला आहे

हे वर नमूद शाबित झालेल्या घटनांवरून स्पष्ट होत आहे. परिणामी, दावा मिळकत पडसर जागा अस्तित्वात नसल्याचे नि.३/७, ३/८ वरील न्यायनिर्णयावरून शाबित झाल्यामुळे नि.३/१ ते ३/५ वरील उता-यांवरून वादी यांचे ताब्यामध्ये दावा मिळकत पडसर जागेचा कब्जा आहे असे दिसत असले तरी सदरचा ताबा केवळ कागदोपत्री असल्याचे प्रथमदर्शनी शाबित होत आहे.

११. वादी यांनी २०१२(२)महा.लॉ.जर्नल २१५ गोरख महादेव सुरवसे विरूध्द नारायण बाळु ढोंबे या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. मी वर नमूद न्यायनिर्णयाचे अवलोकन केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये पक्षकारांनी मिळकतीवरील ताबा पुष्टी देणा-या पुराव्यानुसार शाबित करणे अत्यंत आवश्यक आहे असा निष्कर्ष नोंदविला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकत पडसर जागा अस्तित्वात नाही हे प्रथमदर्शनी शाबित झालेले आहे, त्यामुळे, सदर मिळकतीवर वादी यांचा कब्जा आहे हे शाबित होत नाही. परिणामी, वर नमूद न्यायनिर्णयाचा आदर ठेवून माझे असे मत आहे की सदरचा न्यायनिर्णय दाव्यातील वर नमूद परिस्थितीला लागू पडत नाही. वादी यांनी २००३(३)सिव्हील लॉ.जर्नल ८३९ मुदाण्णा विरूध्द ग्रुप ग्रामपंचायत, केंगेरी-हुबळी या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. मी वर नमूद न्यायनिर्णयाचे अवलोकन केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये अपीलकर्ता यांचे ब-याच कालावधीपासून मिळकतीवरील ताबा ही घटना निरंतर मनाईचा आदेश करण्यास पुरेशी आहे असा निष्कर्ष नोंदविला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांचा दावा मिळकत पडसर जागा यावरील कब्जा शाबित झालेला नाही. परिणामी, वर नमूद न्यायनिर्णयाचा आदर ठेवून माझे असे मत आहे की सदरचा न्यायनिर्णय दाव्यातील वर नमूद परिस्थितीला लागू पडत नाही. वादी यांनी २००० डी.जी.एल.एस. (एस.सी.)१४८२ ग्रा.पं. नवलाखा विरूध्द उजागर सिंग, ए.आय.आर.१९९६ सर्वोच्च न्यायालय ३७८ देवराम विरूध्द इश्वरचंद या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. मी वर नमूद न्यायनिर्णयांचे अवलोकन केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ११ नुसार रेसजुडिकाटा तत्वाचा बाध येतो का याविषयी निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत. प्रस्तुचा दावा सध्या नि.५ वरील तूर्तातूर्त मनाई आदेश अर्ज निकाली करण्याचे टप्प्यावर आहे. प्रस्तुत दाव्यास रेसजुडिकाटा तत्वाचा बाध येतो अथवा नाही याविषयी दाव्याचे चौकशीअंती निर्णय होणार आहे. परिणामी, वर नमूद न्यायनिर्णयाचा आदर ठेवून माझे असे मत आहे की सदरचे न्यायनिर्णय दाव्यातील वर नमूद परिस्थितीला लागू पडत नाही.

१२. वर नमूद चर्चेमधून दावा मिळकत पडसर जागा अस्तित्वात नाही, दावा

मिळकत पडसर जागेवर वादी यांचा कब्जा नाही हे प्रथमदर्शनी शाबित झाल्यामुळे प्रथमदर्शनी केस वादी यांचे वतीने नाही, तसेच सोयीस्करतेचा तुला देखिल वादी यांचे बाजुने नाही. त्यामुळे, तूर्तातूर्त मनाई आदेश न केल्यास वादी यांचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही.. सबब, वर नमूद विश्लेषनास अनुसरून मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्श नाही असा नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाचा आदेश दाव्याचे अंतिम आदेशावर अवलंबून राहील.

सही/-

( ऋ.रा. पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
शाहुवाडी मलकापूर

स्थळ- शाहुवाडी
दि. १९/०३/२०२२